| MHKO110014022019 | नियमित दिवाणी दावा क्र.१५१/२०१९ मधील<br>नि. क्र. ४५ खालील आदेश<br>मोहन शंकर गुरव<br>वि.<br>रविंद्र शंकर गुरव वगैरे |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी नं. १ यांच्या वारसांना रेकॉर्डवर आणणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल करून अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध दर्शविला आहे.

**०२.** वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ रविंद्र शंकर गुरव हे दि. ०६/०५/२०२२ रोजी मयत झालेले असून त्यांना खालील प्रमाणे वारस आहेत-

| अ. क्र. | वारसाचे नाव व पत्ता |
|---|---|
| अ | श्रीमती छाया रविंद्र गुरव,<br>वय – ५० वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा. पांगे गल्ली, वाठार तर्फ वडगाव, ता. हातकणंगले , जि. कोल्हापूर. |
| ब | पुजा गणेश गुरव,<br>वय – ३० वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा.कोपार्डे गुरव गल्ली, ता. करवीर, जि. कोल्हापूर. |
| क | शिद्धी शिवप्रसाद गुरव,<br>वय – २५ वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा. गुटखिंडी, गुरव गल्ली, वाळवा, जि. सांगली. |
| ड | सोमनाथ रविंद्र गुरव,<br>वय - २३ वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा. पांगे गल्ली, वाठार तर्फ वडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. |
| इ | प्रियांका गणेश कणसे,<br>वय- ३०, धंदा- घरकाम,<br>रा. नवे पारगाव, स्टार गल्ली, मराठी शाळेजवळ,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. |

**०३.** सदरचे वारस सोडून मयत प्रतिवादी क्र. १ कै. रविंद्र शंकर गुरव यांना दुसरे कोणीही वारस नाहीत. तरी दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होणेकरीता प्रतिवादी क्र. १ कै. रविंद्र शंकर गुरव यांचे वर नमूद वारसांना सदर कामी रेकॉर्डवर घेणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे दिलेले आहे. त्यांनी प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदवून असे कथन केले आहे की, अर्ज कायदयास चालणेस पात्र नाही. सबब अर्ज खर्चासहीत नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटणी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ हे दि. ०६/०५/२०२२ रोजी मयत झाले असून मर्यादा कायदा, १९६३ चे आर्टीकल १२० नुसार वादींनी प्रस्तुतचा अर्ज ९० दिवसांच्या आत म्हणजे दि. ०५/०८/२०२२ पर्यंत दाखल करणे गरजेचे होते. तथापि, सदरचा अर्ज दाखल करणेस वादी यांनी १ वर्षाहून अधिक विलंब केलेला आहे. तसेच अर्ज ऑर्डर २२ रूल २ खाली न देता तो ऑर्डर २२ रूल ९ खाली दिला आहे.

**०६.** परंतु, मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिंडींग टाळण्याकरीता व काम गुणदोषांवर चालून निकाली होणेकरीता मयत प्रतिवादी क्र. १ कै. रविंद्र शंकर गुरव यांचे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत कामी नि. ४३ विलंब माफीचा अर्ज व नि. ४४ चा अबेटमेंट चा अर्ज खर्चासहीत मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांना भरपाई करणे गरजेचे नाही. सबब, न्यायाच्या कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करत आहे-

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा नि. ४५ खालील अर्ज विनाखर्च मंजूर करणेत येतो. |
| २. | सदर कामी प्रतिवादी क्र. १ रविंद्र शंकर गुरव यांचे वारस |

| | |
|---|---|
| | अभिलेखावर घेऊन तशी दुरूस्ती या कामी अंतिम आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्तीप्रत सदर कामी हजर करावी. |
| ३. | तसेच, प्रतिवादी क्र. १ रविंद्र शंकर गुरव यांच्या नावापुढे "मयत" असे लिहून तशी दुरूस्ती या कामी अंतिम आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्तीप्रत सदर कामी हजर करावी. |

sd/-

**दिनांकः- ०२.०७.२०२६** **( आर. एस. मोरे )**

**४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,पेठवडगाव**